# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. ५८-६०

( विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीतील बैठका )

**दिनांक : १ मार्च ते १० मार्च २०२१**

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण | निर्णयांची संख्या |
|---|---|---|---|
| ५८ | ४ मार्च | विधानभवन, मुंबई | ० |
| ५९ | ७ मार्च (रविवार) | सह्याद्री अतिथीगृह, मुंबई | २ |
| ६० | ८ मार्च | विधानभवन, मुंबई | ३ |
| | | एकूण | ५ |

**मंत्रिमंडळ निर्णय**
**दि. ७ मार्च २०२१**
**( एकूण निर्णय-२ )**

७ मार्च २०२१
सार्वजनिक बांधकाम विभाग

## राज्यात ७०० किमीच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यास मान्यता

राज्यातील रस्त्यांची इंडियन रोड कॉंग्रेस (आयआरसी) मानकांप्रमाणे सर्वांगीण सुधारणेकरीता आशियाई विकास बँकेकडून एकूण ३५०० कोटींचे अर्थसहाय्य घेण्यास तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्रकल्पासाठी टप्पा-२ मध्ये एकूण ५ हजार कोटी किंमतीची कामे हाती घेण्यास आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यातून राज्यात १० ते १२ मीटर रूंदीच्या ७०० किमी लांबीच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

राज्यात ९० हजार किमी लांबीचे राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग असून त्यापैकी १० हजार किमी लांबीच्या रस्त्यांची आयआरसी मानकांप्रमाणे सुधारणेची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे हाती घेण्यात आली आहेत. यापैकी ९ हजार किमी लांबीची कामे हायब्रीड ॲन्युईटीअंतर्गत व १ हजार किमीची कामे आशियाई विकास बँकेच्या कर्जरूपी अर्थसहाय्याने सुरु आहेत.

तसेच टप्पा-२ अंतर्गत कर्ज मंजूर झाल्यावर टप्पा-३ अंतर्गत ३५०० कोटी कर्ज घेऊन आणि १५०० कोटी राज्य हिस्सा अशी ५ हजार कोटी रस्ते सुधारणेसाठी कर्ज घेण्यास परवानगीसाठी केंद्र शासनाच्या वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात आली. या रकमेतून देखील १० ते १२ मीटर रूंदीच्या ७०० किमी लांबीच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

-----०-----

७ मार्च २०२१

वैद्यकीय शिक्षण विभाग

## परिचर्या परिषदेवरील प्रशासकास मुदतवाढीसाठी अधिनियमात सुधारणेस मान्यता

महाराष्ट्र परिचर्या परिषद (सुधारणा) अधिनियम २०१८ तील तरतुदीनुसार या परिषदेवरील प्रशासकाची मुदत २ वर्षे आहे. तथापि कोविड १९ मुळे विहित मुदतीमध्ये परिषदेची निवडणूक घेता आली नसल्याने परिषदेवर नियुक्त प्रशासकाला पुर्वलक्षी प्रभावाने एक वर्षाची मुदतवाढ देण्यासाठी अधिनियमात सुधारणेचा निर्णय आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

महाराष्ट्र राज्यातील परिचारिकांची नोंदणी व प्रशिक्षण यांचे विनियमन करणाऱ्या विधिंचे एकत्रिकरण करण्यासाठी व त्यात अधिक चांगली तरतूद करणे या प्रयोजनासाठी शासनाने महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ राज्यामध्ये लागू केला आहे. या अधिनियमाच्या कलम ३ प्रमाणे परिषदेची प्रस्थापना करण्यात येते. राज्यातील नोंदणीकृत परिचारिका संवर्गातील विहित पध्दतीने निवडून आलेल्या व्यक्तींची आणि शासन नामनिर्देशित व्यक्तींची मिळून परिषदेची संरचना आहे. परंतू कोविड १९ च्या प्रभावामुळे निवडणूक घेणे शक्य झाले नाही. परिणामी नियुक्त प्रशासकांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी महाराष्ट्र परिचारीका अधिनियम, १९६६ च्या कलम ४० मध्ये सुधारणा करण्यास मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

## मंत्रिमंडळ निर्णय
## दि. ८ मार्च २०२१
## ( एकूण निर्णय-३ )

दि.८ मार्च २०२१
परिवहन विभाग (रेल्वे कक्ष)

### पुणे-नाशिक मध्यम अतिजलद रेल्वे मार्गाचे काम हाती घेण्यास मान्यता

पुणे-नाशिक या नवीन दुहेरी मध्यम अतिजलद रेल्वे मार्गाचे बांधकाम हाती घेण्यास आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

पुणे-नाशिक मध्यम अतिजलद रेल्वे मार्गाच्या बांधकामात राज्य शासनाचा आर्थिक सहभाग असणार आहे. या प्रकल्पासाठी १६ हजार ३९ कोटी रुपये एकूण खर्च अपेक्षित आहे. या मार्गामुळे राज्यातील पुणे व नाशिक ही दोन महत्वाची शहरे रेल्वे मार्गाने जोडली जाणार आहेत.

-----o-----

दि.८ मार्च २०२१
कौशल्य विकास विभाग

### महाराष्ट्र शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना राबवणार

महाराष्ट्र शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना सुरू करण्यास मान्यता देण्याचा निर्णय आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या निर्णयामुळे राज्यातील दोन लाख उमेदवारांना योजनेच्या माध्यमातून रोजगारसंधी उपलब्ध होणार आहेत. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी योजनेच्या धर्तीवर ही योजना सुरु करण्यात येणार आहे. यात २७ गटांतील २५८ निर्देशित, ३५ गटांतील ४१४ वैकल्पिक, ६ गटांतील २० तंत्रज्ञ आणि महाराष्ट्र कौशल्य मंडळाचे १२३ व्यवसायात शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षण घेता येणार आहे. या उमेदवारांचे प्रशिक्षणाचे मानधन थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे देण्यात येणार आहे.

-----o-----

दि. ८ मार्च २०२१
वैद्यकीय शिक्षण विभाग

## शासकीय आरोग्य संस्थांच्या श्रेणीवर्धन आणि बांधकामासाठी आशियाई विकास बँकेकडून निधी घेण्यास मान्यता

शासकीय आरोग्य संस्थांच्या श्रेणीवर्धन आणि बांधकामासाठी आशियाई विकास बँकेकडून निधी घेण्यास मान्यता देण्याचा निर्णय आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत वेळोवेळी नवीन आरोग्य संस्था स्थापनेस तसेच श्रेणीवर्धनास मान्यता देण्यात आलेली आहे. याअंतर्गत बांधकामाबरोबरच यंत्रसामुग्री, उपकरणे, मनुष्यबळ उपलब्ध करण्याकरीता निधीची आवश्यकता भासते. जनतेस उत्तम दर्जाची आरोग्य सुविधा मिळण्याकरीता निधी उपलब्धतेसाठी आशियाई विकास बँकेकडून ५ हजार १७७ कोटी इतके कर्ज घेण्यात येणार असून राज्य हिश्याची रक्कम २ हजार २९० कोटी इतकी असणार आहे. हा निधी नवीन व आवश्यक संस्थांकरीता तसेच अद्याप बांधकाम सुरु न केलेल्या संस्थाकरीता खर्च करण्यात येणार आहे.

-----०-----